
पी एम सन्मान योजना ही शेतकऱ्यांप्रती केंद्र सरकारची असलेली बांधिलकी : केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव >>पान 2

हिंदुत्वावर आरोप करणाऱ्याला त्याची किंमत चुकवावी लागेल >>पान 3

शेतकरी अतिवृष्टीने उध्वस्त झाल्यानंतर तब्बल महिन्याभराने पालकमंत्री मकरंद पाटील यांना आली जाग >>पान 4

दैनिक
# आपला विदर्भ



शाहरुख खानला जवानसाठी दिला गेला राष्ट्रीय पुरस्कार, अभिनेत्यानं व्यक्त केल्या भावना
आतील पान

**सुविचार**
नेहमी आपल्या ध्येयावर लक्ष केंद्रित करा.

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 15 ■ रविवार, दि. 03 ऑगस्ट 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# डोनाल्ड ट्रम्प यांनी २५ टक्के टॅरिफ लादलं, नरेंद्र मोदींनी दिला स्वदेशीचा नारा

वाराणसी: पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज उत्तर प्रदेशातील वाराणसी येथे सुमारे २,२०० कोटी रुपयांच्या विकास कामांची पायाभरणी आणि उद्घाटन केले. वाराणसीमधून पीएम किसान सन्मान निधीच्या २० व्या हप्त्याचं वितरण करण्यात आलं. नरेंद्र मोदी यांनी वाराणसीतील कार्यक्रमातून स्वदेशीचा नारा दिला. याशिवाय व्होकल फॉर लोकल हा मंत्र आचरणात आणा, असं आवाहन देखील केलं. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर २५ टक्के टॅरिफ लादण्याची घोषणा केलेली असताना नरेंद्र मोदींनी स्वदेशीचा नारा देणं महत्त्वाचं मानलं जात आहे.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागरिकांना त्यांच्या जबाबदाऱ्यांची आठवण करुन देत सर्वांनी स्वदेशीची शपथ घ्यावी असे आवाहन केले. कोणत्याही भारतीयाच्या घामातून आणि प्रयत्नांतून तयार झालेली कोणतीही वस्तू म्हणजे स्वदेशी आहे अशी स्वदेशीची व्याख्या मोदींनी केली. नागरिकांनी व्होकल फॉर लोकल हा मंत्र आचरणात आणावा असे आवाहन त्यांनी देशाला केले.

नागरिकांनी मेक इन इंडिया उत्पादनांना प्रोत्साहन देण्याची शपथ घ्यावी, असे आवाहनही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यावेळी केले. आपल्या घरात येणारी प्रत्येक नवीन वस्तू स्वदेशी असली पाहिजे आणि प्रत्येक भारतीयाने ही जबाबदारी स्वीकारली पाहिजे, असे ते म्हणाले. प्रत्येक व्यापारी आणि दुकानदाराने केवळ स्वदेशी वस्तू विकण्याची शपथ घ्यावी, असे आवाहनही त्यांनी केले. ही कृतीच देशाची खरी सेवा असेल, असे ते म्हणाले. आगामी सणासुदीच्या काळात लोकांनी स्वदेशी उत्पादनांचा वापर करावा, असे आवाहन त्यांनी केले, ही महात्मा गांधी यांना खरी श्रद्धांजली असेल, असं नरेंद्र मोदी म्हणाले.

नरेंद्र मोदींनी जागतिक अर्थव्यवस्था सध्या अनेक अनिश्चितता आणि अस्थिरतेच्या वातावरणाचा सामना करत असल्याचे अधोरेखित केले. अशा परिस्थितीत, जगभरातील देश आपल्या हितावर लक्ष केंद्रित करत आहेत, ही बाब त्यांनी अधोरेखित केली. आता भारत जगातील तिसऱ्या क्रमांकाची सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे, अशावेळी भारताने आपल्या आर्थिक हिताबाबत सतर्क राहिले पाहिजे, असे ते म्हणाले. शेतकऱ्यांचे आणि लघु उद्योगांचे कल्याण आपल्या सर्वोच्च प्राधान्यक्रमावर आहे आणि सरकारही या दिशेने सर्वतोपरी प्रयत्न करत आहे, ही बाब त्यांनी अधोरेखित केली.

विकसित भारताचे स्वप्न केवळ सामूहिक प्रयत्नातूनच साकार होईल ही बाब त्यांनी अधोरेखित केली. आपल्या भाषणाच्या समारोपात त्यांनी आज उद्घाटन झालेल्या विकास कामांबद्दल पुन्हा एकदा जनतेचे अभिनंदन केले. या कार्यक्रमाला उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. केंद्रीय मंत्री शिवराज सिंह चौहान यांच्यासह राज्यपाल, मुख्यमंत्री, केंद्रीय आणि राज्य मंत्री तसेच इतर मान्यवर व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे या कार्यक्रमात सहभागी झाले.

## अमरावतीत महिला पोलिसाची हत्या : नागरिकांना हादरा

**अमरावती/प्रतिनिधी :**शहरातील फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात कार्यरत महिला कर्मचाऱ्याची गळा दाबून हत्या करण्यात आल्यानं मोठी खळबळ उडाली. ही धक्कादायक घटना शुक्रवारी सायंकाळी वडाळी परिसरातील गुरुकृपा कॉलनी इथं उघडकीस आली. आशा राहुल धुळे (तायडे), असं हत्या झालेल्या महिलेचं नाव आहे. विशेष म्हणजे महिला पोलिसाची हत्या करण्यात आली, तेव्हा महिलेचा पती मुलांना घेऊन बाहेर गेलेले होते, अशी माहिती सूत्रांनी दिली.

आशा धुळे (तायडे) या फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात कार्यरत होत्या. त्यांचे पती राहुल धुळे हे राज्य राखीव पोलीस दल क्र. ९ मध्ये शिपाई पदावर कार्यरत आहेत. गेल्या १३ तारखेपासून आशा धुळे (तायडे) या रजेवर होत्या. त्यांना चौदा वर्षाचा एक मुलगा तर सात वर्षाची एक मुलगी आहे. शुक्रवारी सायंकाळी सहा वाजताचे सुमारास त्या घरात एकट्या होत्या. पती, मुलगी व मुलगा बाहेर होते. मुलगा सायंकाळी सहा वाजता घरात जात असताना त्यांच्या घरातून दोन व्यक्ती बाहेर येत असल्याचं त्याला दिसले. यानंतर त्यानं घरात प्रवेश केला असता, त्याची आई बिछान्यावर बेशुद्ध अवस्थेत पडली होती. त्यानं आईला उठवण्याचा प्रयत्न केला, परंतु आईनं प्रतिसाद दिला नाही. यामुळे घाबरलेल्या मुलानं तत्काळ वडिलांना माहिती दिली. शेजाऱ्यांना देखील घटनेची माहिती देण्यात आली. काही मिनीटातच महिला पोलीस कर्मचाऱ्याच्या घरी मोठी गर्दी उसळली. पोलिसांना माहिती मिळताच फ्रेजरपुरा ठाणेदार रोशन शिरसाट घटनास्थळी दाखल झाले. मृतदेह शवविच्छेदनासाठी जिल्हा सामान्य रूग्णालयात पाठवण्यात आला. या घटनेमुळं गुरुकृपा कॉलनीसह शहरात मोठी खळबळ उडाली आहे.

## पुण्यातील यवतमध्ये परिस्थिती नियंत्रणात, संचारबंदी लागू

**पुणे/प्रतिनिधी :** पुणे जिल्ह्यातील दौंड तालुक्यातील यवत गावात एका व्यक्तीने स्टेटसला एक संदेश ठेवला होता. या स्टेटसवरुन गावात शुक्रवारी १ ऑगस्ट रोजी हिंसा झाली होती. पोलिसांनी हस्तक्षेप करुन परिस्थिती नियंत्रणात आणली. आता यवतमध्ये संचारबंदी लागू आहे. विना परवानगी पाच किंवा त्यापेक्षा जास्त लोकांना एकत्र येण्यास मनाई करण्यात आली आहे. यवतमधील परिस्थिती नियंत्रणात आली आहे. हिंसेप्रकरणी गुन्हे दाखल करुन पोलिसांनी कायदेशीर कारवाई सुरू केली आहे. कारवाईसाठी एक पुरावा म्हणून पोलिसांनी कॅमेरा फूटेजची मदत घेण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी यवतचे व्हायरल व्हिडीओ, प्रसारमाध्यमांकडे असलेले व्हिडीओ तसेच गावात असलेल्या कॅमेऱ्यांच्या फूटेजची तपासणी होणार आहे.

# अटक करून दाखवाच, राज ठाकरेंचे मुख्यमंत्र्यांना आव्हान

## अर्बन नक्षली सारखे वागाल तर तुम्हालाही अटक होईल; फडणवीसांचेही प्रत्युत्तर

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी रायगडमधील आपल्या भाषणात शेकापचे नेते जयंत पाटील यांचं कौतुक करताना येथील शेतकरी व कामगारांना मोलाचा सल्ला दिला. तसेच, येथील उद्योग उभारणीसाठी शेतकऱ्यांच्या जमिनी घेतल्या जात आहेत, अन् अमराठी कामगारांना नोकरी दिली जात असल्याचं त्यांनी म्हटलं.

दरम्यान, राज ठाकरेंनी शासनाच्या धोरणावर टीका करताना जनसुरक्षा कायद्यावरुन टोलाही लगावला. आता काय तो कायदा आणला म्हणे, अर्बन नक्षल म्हणून अटक करणार, पण अटक करुनच दाखवा, असे चॅलेंजच राज ठाकरेंनी दिले. त्यावर, आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी प्रत्युत्तर दिलं आहे. तुम्ही अर्बन नक्षलसारखे वागाल तर तुमची अटक होईल, असे फडणवीसांनी म्हटले.

राज ठाकरेंनी जनसुरक्षा कायद्यावरुन केलेल्या टीकेसंदर्भात मुख्यमंत्र्यांना प्रश्न विचारण्यात आला होता. तुम्ही कार्यकर्त्यांना अटक करुन दाखवाच? असं राज ठाकरे म्हणाले. त्यावर, मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिलंय. त्यांच्याकरिता हा कायदा बनलाच नाही, तुम्ही अर्बन नक्षलसारखे वागाल तर तुमची अटक होईल, तुम्ही अर्बन नक्षलसारखे वागत नाही तर तुमची अटक करण्याचे कारण नाही, असे म्हणत राज ठाकरेंच्या टीकेला देवेंद्र फडणवीसांनी प्रत्युत्तर दिले. तसेच, जे लोक कायद्याच्या विरोधात, त्यांच्याकरिता तो कायदा आहे, आंदोलकांच्या विरोधात हा कायदा नाही. सरकारच्या विरोधात बोलण्याची मुभा आहे, त्यामुळे मला असं वाटतं ज्या कमेंट्स आहेत ते कायदा न वाचता केलेल्या कमेंट्स आहेत, असा टोलाही मुख्यमंत्र्यांनी राज ठाकरेंना लगावला.

मराठी भाषेसंदर्भाने बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, माझं अतिशय पक्क मत आहे, महाराष्ट्रात मराठी शिकली पाहिजे. ती अनिवार्य असली पाहिजे, ती अनिवार्य आपण केलीच आहे. पण, महाराष्ट्रातील मराठी मुलांना मराठीसोबत अजून एक भारतीय भाषा शिकायला



मिळाली तर त्यात काय वावगे आहे. आपण भारतीय भाषांना विरोध करायचा आणि इंग्रजी भाषेंच्या पायघड्या घालायच्या त्या मानसिकतेला माझा विरोध आहे, असे म्हणत राज ठाकरेंनी केलेल्या मराठी भाषेच्या टीकेवरूनही मुख्यमंत्र्यांनी पलटवार केला.

राज ठाकरे म्हणाले, सर्व जमिनी आणि याच्यावरती काय तर म्हणे राज्य सरकारने कायदा आणला आहेत. तुम्ही कोण आहात तर तुम्ही अर्बन नक्षल आहात. शहरांमध्ये राहणारे नक्षल. तुम्ही जर कशाला विरोध केला, कुठल्या प्रकल्पाला विरोध केला तर सरकार तुम्हाला अटक करू शकते, एकदा करूच देत असे म्हणत राज ठाकरेंनी जनसुरक्षा कायद्यावरुन सरकारला इशारा दिला. तसेच, या महाराष्ट्रामध्ये मराठी माणसाच्या थडग्यावरती उद्योग उभे राहू देणार नाही. उद्योग आणायचे असतील तर मराठी माणसाचा मानसन्मान ठेवूनच ते उद्योग इथे आणावे लागतील. त्याशिवाय तुम्हाला ते आणता येणार नाहीत. कोण कुठे येतो आणि काहीही करतो, पत्ताच लागत नाही. या संपूर्ण राज्यामध्ये कोणत्या प्रकारची प्रगती होते, कुठून रस्ते निघणार आहेत, काय निघणार आहेत, फक्त मंत्र्यांना माहिती आहेत. का? तेच ठरवणार का? आणि रस्ता व्हायच्या आधीच तेच तिथल्या जमिनी घेणार आणि मग या सर्व उद्योगपतींची व्यवहार करणार आणि निवडणुकीच्या तोंडावरती आपल्याला गप्प बसवणार. विषय गेला बाजूला, विचार केला बाजूला, तुमच्या तोंडावरती फक्त पैसे फेकून मारणार आणि तुमच्याकडून मत घेणार. एवढा एकमेव उद्योग महाराष्ट्रात सुरू आहे. कोणी खोलात जाऊन बघायला तयार नाही. कोणी खोलात जाऊन विचार करायला तयार नाही. याच्यापुढे आपलं काय होणार असे पुढे राज ठाकरे यांनी म्हटलं आहे.

## पेट्रोल-डिझेलचे दर भडकण्याची शक्यता, रशिया-अमेरिका वादाचा फटका



नवी दिल्ली : रशिया आणि अमेरिका यांच्यातील तणाव वाढत असल्याचं चित्र आहे. दोन्ही देशांमधील तणाव वाढल्यानं तेलाच्या जागतिक पुरवठ्यात अडथळे निर्माण होऊ शकतात. ऑईल मार्केट एक्सपर्टसनं एएनआयशी संवाद साधताना म्हटलं की येत्या काही महिन्यांमध्ये ब्रेंट क्रूड ऑईलच्या दरात वाढ होऊन ते ८० डॉलर प्रति बॅरल पर्यंत पोहोचू शकतात. भूराजकीय जोखीम वाढल्यानं तेलाच्या दरांवर दबाव वाढू शकतो. वेंचुरामधील कमोडिटीज आणि सीआरएम हेड एन एस रामास्वामी यांनी म्हटलं की ब्रेंट ऑईलचे दर ऑक्टोबर दरम्या ७२.०७ डॉलरवरुन ७६ डॉलरवर पोहोचू शकतात. २०२५ च्या शेवटी हे दर ८०-८२ डॉलर पर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रशियाला यूक्रेन सोबतचं युद्ध थांबवण्यासाठी १०-१२ दिवसांचा वेळ दिला आहे. जर रशियानं युद्ध थांबवलं नाही तर रशियासोबत व्यापार करणाऱ्या देशांवर अमेरिका अतिरिक्त निर्बंध लादणार असून १०० टक्के दुय्यम टॅरिफ लादणार असल्याचा इशारा दिला आहे.

## विमान प्रवासात गैरवर्तन किंवा मारहाण केल्यास काय असते शिक्षा? जाणून घ्या नियम आणि कायदे

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईहून कोलकाताकडे जाणाऱ्या इंडिगोच्या विमानात नुकतीच एक धक्कादायक घटना घडली. प्रवासादरम्यान एका प्रवाशाला अचानक पॅनिक अटॅक आला. यावेळी त्याच्या शेजारी बसलेल्या दुसऱ्या प्रवाशाने त्याला कोणतीही मदत न करता उलट त्याला चापट मारली. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल झाला असून अनेक युजर्सनी यावर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत. इंडिगोने त्यांच्या ` म्हणजेच ट्विटरवर माहिती देताना सांगितले की, चापट मारणाऱ्या व्यक्तीस पोलिसांनी अटक केली आहे.

दरम्यान, अशाच स्वरूपाची आणखी एक घटना थ्ल्षूप्रहेर एअरलाइन्सच्या म्यूनिखहून बँकॉककडे जाणाऱ्या विमानात घडली. एका नवरा-बायकोच्या वादामुळे या विमानाची आपत्कालीन लँडिंग दिल्लीत करण्यात आली. या घटनांमुळे विमानप्रवासात असलेल्या नियमांचे पालन करणे किती गरजेचे आहे हे पुन्हा एकदा समोर आलं आहे.

आपण अनेकदा विमानाने प्रवास करतो. पण आपल्याला प्रवासात कोणते नियम पाळावे लागतात हे माहिती नसते. आज आम्ही तुम्हाला याबद्दल सांगणार आहोत. विमानात प्रवास करताना प्रवाशांच्या सुरक्षेसाठी विविध नियम आणि कायदे लागू करण्यात आले आहेत. प्रवासादरम्यान खालील गोष्टी लक्षात ठेवणे खूप गरजेचे असते.

पेट्रोल, डिझेल, गॅस किंवा फटाके यांसारख्या ज्वलनशील वस्तू विमानात नेण्यास सक्त मनाई आहे. यामुळे अपघाताची शक्यता असते. तसेच चाकू, कात्री, ब्लेड अशा वस्तू विमानात नेण्यास मनाई आहे. अशा वस्तूंचा वापर दहशतवादी किंवा गुन्हेगारी उद्देशाने होऊ शकतो. बंदूक, रायफल, पिस्तूल हे देखील नेल्यास त्या व्यक्तीला थेट पोलिसांच्या ताब्यात दिले जाते. शिवाय अशा प्रवाशांवर भविष्यातील हवाई प्रवासावर बंदी घातली जाऊ शकते.

विमानात इतर प्रवाशांशी भांडणे, मारहाण करणे, गोंधळ घालणे यावर कडक कारवाई केली जाते. अशा प्रवाशांवर दंड, तुरुंगवास किंवा फ्लाइट बॅनची शिक्षा होऊ शकते. विमानात गैरवर्तन करणाऱ्यांवर डायरेक्टोरेट जनरल ऑफ सिव्हिल एव्हिएशनच्या नियमानुसार कारवाई केली जाते. यामध्ये: पहिल्या वेळेस त्रास दिल्यास ३ महिन्यांपर्यंत प्रवास बंदी. पुन्हा गंभीर वर्तन आढळल्यास ६ महिन्यांपासून ते कायमस्वरूपी प्रवासबंदी. फौजदारी गुन्हा दाखल करून तुरुंगवासाची शक्यता.

त्यामुळे विमान प्रवास करत असताना केवळ आपल्या नव्हे तर इतरांच्या सुरक्षेचाही विचार करणे ही प्रत्येक प्रवाशाची जबाबदारी आहे.


# प्रज्वल रेवण्णाला बलात्कार प्रकरणात जन्मठेप

**न्यायालयाने काल माजी पंतप्रधानांच्या नातवाला दोषी ठरवले होते; मोलकरणीचे शोषण केले होते**

बंगळुरू : कर्नाटकच्या बंगळुरू येथील जनता दल सेक्युलर पक्षाचे माजी खासदार आणि पंतप्रधान एचडी देवेगौडा यांचे नातू प्रज्ज्वल रेवण्णा यांना न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. फार्म हाऊसमध्ये काम करणाऱ्या महिलेवरील बलात्कारप्रकरणी प्रज्वल रेवण्णावर विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. गेल्या वर्षभरापासून याप्रकरणी न्यायालयीन खटला सुरू होता, अखेर आज बंगळुरू येथील विशेष न्यायालयाने प्रज्ज्वल रेवण्णा यास दोषी ठरवून जन्मठेपेची शिक्षा ठोठावली आहे. त्यामुळे, जनता दल सेक्युलर पक्षाला हा मोठा झटका मानला जातो. दरम्यान, लोकसभा निवडणुकांपूर्वीच प्रज्वल रेवण्णा यांच्यावरील आरोपांमुळे राजकीय वर्तुळात रान उठले होते.

त्यानंतर, देशभरात हे प्रकरण चर्चेत असल्याने आजच्या न्यायालयाच्या निर्णयाकडे देशाचे लक्ष लागले होते.

बंगळुरुमधील विशेष न्यायालयाने काल (शुक्रवारी ता. १) जनता दल (सेक्युलर) चे माजी खासदार आणि माजी पंतप्रधान एचडी देवेगौडा यांचा नातू प्रज्वल रेवण्णा याला चार लैंगिक शोषण व बलात्कार प्रकरणांपैकी एका प्रकरणात दोषी ठरवले. विशेष न्यायाधीश संतोष गजानन भट यांनी आज रेवण्णाला जन्मठेपेची शिक्षा सुनावली. रेवण्णाने त्याच्या कुटुंबाच्या फार्महाउसमध्ये काम करणाऱ्या एका ४७ वर्षीय महिलेने मागील वर्षी एप्रिलमध्ये त्याच्याविरोधात एफआयआर दाखल केली होता. तिने रेवण्णा यांच्यावर २०२१ पासून अनेकवेळा बलात्कार केल्याचा आणि या घटनेबद्दल कोणालाही सांगितल्यास व्हिडिओ लीक करण्याची धमकी दिल्याचा आरोप केला होता. त्यानंतर आता रेवण्णावर बलात्कार, धमकी देणे आणि अश्लील फोटो लीक करणे अशा कलमांखाली आरोप करण्यात आले होते. गेल्या वर्षी सेक्स स्कॅण्डलमध्ये समोर आल्यानंतर



रेवण्णाचे नाव चर्चेत आलं होतं. रेवण्णावर ५० हून अधिक महिलांवर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे.

दरम्यान, जेव्हा रेवण्णाच्या फार्म हाऊसमधील मोलकरणीने तक्रार दाखल केली, तेव्हा प्रज्वलविरुद्ध पहिला गुन्हा २८ एप्रिल २०२४ रोजी नोंदवण्यात आला. तक्रारदार महिला ही कुटुंबाच्या फार्महाउसमध्ये काम करणारी ४७ वर्षीय माजी मोलकरणी होती. तिने सांगितले की प्रज्वलने तिच्यावर एकदा नाही तर दोनदा बलात्कार केला.

साडी ठरली महत्त्वाचा पुरावा

या प्रकरणातील सर्वात महत्त्वाचा पुरावा म्हणजे घटनेच्या वेळी पीडितेने घातलेली साडी ही ठरली आहे. तपासात त्या साडीवर शुक्राणूंचे (स्पर्मचे) डाग आढळून आले आहेत. जे फॉरेन्सिक तपासणीमध्ये रेवण्णाचे असल्याचं समोर आलं आहे. मोलकरणीची ती साडी मोठा पुरावा म्हणून न्यायालयात सादर करण्यात आली होती. हा सर्वात मोठा पुरावा मानला गेला. त्याचबरोबर बलात्काराचे व्हिडिओ देखील कोर्टात सादर करण्यात आले होते. पीडितेने केवळ साडी जपून ठेवली नाही. तर तिने या घटनेचा व्हिडिओ देखील रेकॉर्डही केला होता.

## कोण आहे प्रज्वल रेवण्णा

प्रज्वल रेवण्णा माजी पंतप्रधान देवेगौडांचे नातू आहेत तर त्यांचे वडील कुमारस्वामी सध्या केंद्रात अवजड उद्योग मंत्री आहेत. हे प्रकरण २४ एप्रिल २०२४ रोजी हासनच्या स्टेडियमवर शेकडो पेन ड्राइव्ह सापडल्याने समोर आले. या पेन ड्राइव्हमध्ये प्रज्वल रेवण्णांचे दोन हजार आठशे सत्तर व्हिडीओ क्लिप्स आणि फोटो होते. व्हिडीओत अनेक महिलांसोबतचे शरीरसंबंध दिसून येत होते. त्यानंतर, याप्रकरणी पन्नास महिलांच्या तक्रारी आल्या असून, बारा महिलांनी बलात्काराचा आरोप केला आहे. व्हिडीओ समोर येताच रेवण्णा भारताबाहेर निघून गेला होता. ३१ मे रोजी जर्मनीतून भारतात येताच त्याला अटक करण्यात आली. खटल्यात सव्वीस साक्षीदार, शंभर ऐंशी कागदपत्रे आणि अडतीस सुनावण्या झाल्या आहेत. प्रज्वलला दहा वर्षांपर्यंतची कैद ते जन्मठेपेपर्यंतची शिक्षा वर्तवण्यात येत होती. अखेर, काल दोषी ठरल्यानंतर प्रज्वल रेवण्णा न्यायालयात रडला होता, आज त्याला विशेष न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली.

## सुंदर नाते मैत्रीचे

मैत्री पाहायला गेलं तर अगदी दोन अक्षरी शब्द पण या दोन अक्षरी शब्दात जगातील सर्वात पवित्र अशी भावना लपली आहे. जगातील सर्वात सुंदर नातं कोणतं असेल तर ते मैत्रीचं नातं, कारण या नात्यात कोणताही स्वार्थ नसतो. मैत्री कधीही ठरवून होत नाही. मैत्री कशी, कधी, कोणाशी होईल हे कोणीच सांगू शकत नाही. मैत्रीला काळाची, वेळेची, वयाची बंधने नसतात. मैत्रीत जात, धर्म, वर्ण, लिंग असा कोणताही भेदभाव नसतो. लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत कोणाशीही मैत्री होऊ शकते. समान छंद, समान आवडी, समान विचारधारा आणि परस्परांचे स्वभाव जुळले की मैत्री जमते. रक्ताच्या नात्यापेक्षाही मैत्रीचे नाते महत्वाचे आहे. जगात मित्र नाही असा कोणताच व्यक्ती नाही. भारतात तर पौराणिक काळापासून मैत्रीला महत्व आहे. श्रीकृष्ण सुदामा यांची तर मैत्री अजरामर आहे. काळ बदलला तरी मैत्रितील पवित्र भावना आजही तीच आहे. मैत्री ही प्रामाणिक आणि तरळ भावना आहे. मित्रा समोरच आपण आपलं मन मोकळं करू शकतो. मानवी जीवनात क्षणाक्षणाला काहीना काही घडत असते. काही चांगले काही वाईट घडत असते. या बऱ्या वाईट घटनांच्या अपरिहार्यतेचा विचार करता मैत्री आणि मित्र आवश्यक असतातच. मंदिरातील देवासमोर जसे आपण आपले मन मोकळे करतो तसेच आपण आपल्या खऱ्या मित्रा जवळही आपले मन मोकळे करतो. आजकाल मैत्रीतही हिशोबीपणा आला आहे. मैत्रीतही स्वार्थ आला आहे. त्यामुळे मैत्रिची पवित्र भावना काळवंडू लागली आहे. स्वार्थाच्या अंधारात मैत्री चाचपडू लागली आहे त्यामुळे मैत्रीतून मिळणारा आनंदही कमी होऊ लागला आहे. स्वार्थी मित्र आपण सहज ओळखू शकतो. स्वतःच्या स्वार्थासाठी जवळ येणारे मित्र आपल्याला संकटकाळात मदत करत नाहीत. जो आपल्याला संकटकाळात मदत करतो तोच खरा मित्र असतो. जीवनाच्या प्रवासात अनेक मित्र भेटतात, निघून जातात पण मनाने जुळलेले मित्र मात्र कायम राहतात. मित्रांमुळे आपल्याला व्यवहार कळतो. अडचणी सुटतात, संकटावर मात करण्याचे धाडस निर्माण होते. मैत्रीमुळे आपली निर्णय क्षमता वाढते. इतकेच काय तर मैत्रीमुळेच माणूसकी जिवंत आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. केवळ सहवास म्हणजे मैत्री नव्हे, सहवास आणि मैत्री यात फरक आहे. सहवासाने मैत्री फुलत जाते हे जरी खरे असले तरी मैत्रीसाठी मित्र दररोज जवळ असावाच असे काही नाही. अनेकदा जिवलग मित्र जवळ नसतात. कित्येक दिवस त्यांच्यात बातचीत होत नाही तरीही त्यांची मैत्री कायम असते अगदी श्रीकृष्ण सुदाम्या सारखी. पु .ल. देशपांडे यांनी मैत्री विषयी एक फार सुंदर कविता लिहिली आहे. ते लिहितात रोज आठवण व्हावी असे काही नाही. इतकंच काय रोज बोलणं व्हावं असंही काही नाही. पण मी तुला विसरणार नाही ही झाली खात्री आणि तुला याची जाणीव असणे ही झाली मैत्री. अशी सरळ सोपी पण घट्ट मैत्री टिकवणं, निर्माण करणं फार कठीण नाही आणि फार सोपंही नाही. मनाचा एवढा हळवेपणा नवरा बायकोच्या नात्यामध्ये नाही हो येत, तिथे मित्रच असावा लागतो. कारण इतर कोणत्याही नात्याला आपण नाव दिले की, त्याबरोबर कौटुंबिक, सामाजिक, मानसिक आणि शारीरिक बंधने येतात. या नात्याला मात्र कसले नाव नाही त्यामुळे कसली बंधनंही नाहीत किंबहुना ती तशी नसावीतही. मित्रांशी वाट्टेल त्या विषयावर आपण गप्पा मारू शकतो, मोकळे होऊ शकतो, तिथे स्त्री – पुरुष, जात – पात, वय काही आडवे येत नाही. मनसुबा बनून जातो आणि मन आनंदी होतं. शेवटी काय हो भेटी नाही झाल्या तरी गाठी बसणं महत्वाचं. ज्यांनी हे जाणलं त्यांनी माणसातलं माणूसपण जाणलं. पु ल नी मैत्री विषयी किती छान शब्दात लिहिलंय. मैत्री अशीच असते अगदी सुंदर. ज्याने मैत्रीचे सुंदर नाते जपले त्याचे जीवन आनंदाने फुलून गेले. मैत्रीसारखे सुंदर नाते या जगात दुसरे कोणतेही नाही, ज्याला मैत्री समजली त्याला जीवन समजले.

# पी एम सन्मान योजना ही शेतकऱ्यांप्रती केंद्र सरकारची असलेली बांधिलकी : केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** शेतकरी हा देशाचा अन्नदाता आहे त्याला आर्थिक हातभार देण्याच्या दृष्टिकोनातून करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पीएम किसान सन्मान योजना सुरू केली ही केंद्र सरकारची शेतकरी प्रति असलेली बांधिलकी असल्याचे प्रतिपादन केंद्रीय आयुष आरोग्य व कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांना व्यक्त केले

पी एम किसान सन्मान निधीचा विसावा हप्ता आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते वितरित करण्यात आला त्यानिमित्य वाराणसी येथे मुख्य कार्यक्रम संपन्न झाला तर बुलढाणा येथील कृषी विज्ञान केंद्र येथे केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या उपस्थित एक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते त्यावेळी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करतांना केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव बोलत होते यावेळी व्यासपिठावर कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ झापे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री मनोज ढगे, प्रकल्प संचालक आत्मा श्री पुरुषोत्तम उन्हाळे युवासेना नेते कुणल गायकवाड उपस्थित होते केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव पुढे म्हणाले की शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या दृष्टिकोनातून शेतकऱ्यांना शेतीमध्ये वेगवेगळे प्रयोग करता यावे. वेळेवर त्यांना पैसा उपलब्ध व्हावे या दृष्टिकोनातून पी एम किसान सन्मान योजना शेतकऱ्यांसाठी केंद्र सरकारच्या वतीने सुरू करण्यात आली आहे ही योजना देशातील अन्नदात्याच्या कष्टाचा हा सन्मान करणारी आहे पी एम किसान योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना गरजेच्या वेळी आर्थिक मदत होते शेतीमध्ये लागणारे बी बियाणासाठी या रकमेचा उपयोग होतो ही शेतकऱ्यांसाठी लाभदायी योजना असल्याचे ही त्यांनी सांगितलं याशिवाय केंद्र सरकारच्या वतीने शेतकऱ्यांसाठी विविध योजना राबविते त्या योजनांचा लाभ शेतकऱ्यांनी घेऊन आपली आर्थिक उन्नती करावी अस आवाहन केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी केले. या कार्यक्रमाला शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते...






### शेतकऱ्यांसोबत बसून ऐकलं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे भाषण

किसान सन्मान योजनेचा विसावा हप्ता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज वितरित करण्यात आले त्या निमित्य वाराणसी येथे एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उपस्थितीना संबोधीत केले या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण बुलढाणा येथे झालेल्या कार्यक्रमात दाखविण्यात आला केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी शेतकऱ्यांच्या सोबत बसून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे भाषण एलेडी स्क्रीनवर ऐकले . आपण प्रथम शेतकरी आहोत नंतर मंत्री याचा प्रत्यय भूमिपुत्र केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी आपल्या साध्या वर्तनातून दिला ...

## शाहरुख खानला जवानसाठी दिला गेला राष्ट्रीय पुरस्कार, अभिनेत्यानं व्यक्त केल्या भावना

**मुंबई/प्रतिनिधी :** अभिनेता शाहरुख खान हा खरोखरच भारतीय चित्रपटसृष्टीचा सर्वात मोठा सुपरस्टार आहे, ज्यानं त्याच्या कारकिर्दीत एकामागून एक मेगा ब्लॉकबस्टर चित्रपट दिले आहेत. किंग खान आणि बॉलिवूडचा बादशाहा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शाहरुख खानचा स्टारडम जगभर पसरलेला आहे. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक मोठे सन्मान आणि पुरस्कार जिंकणाऱ्या शाहरुख खानला आता जवानसाठी पहिला राष्ट्रीय पुरस्कार मिळाला आहे. गेल्या ३५ वर्षांपासून तो त्याच्या करिष्मा, हुशारी आणि उत्कृष्ट अभिनयानं प्रेक्षकांच्या मनावर राज्य करत आहे आणि आता तो या राष्ट्रीय पुरस्काराबद्दल पूर्णपणे कृतज्ञ आहे.

जवानमधील भूमिकेसाठी मिळाला पुरस्कार : जगभरातून त्याला मिळणारे प्रेम हे सिद्ध करते की, तो आजपर्यंत भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वात मोठ्या सुपरस्टारपैकी एक आहे.जवान या चित्रपटाला राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्यानंतर अनेकजण त्याच्यावर अभिनंदानाचा वर्षाव करत आहे. ॲक्शन, रोमान्स आणि ड्रामा यांचा मिलाफ करून, शाहरुखनं खरा ब्लॉकबस्टर चित्रपट दिला, ज्यानं बॉक्स ऑफिसवर भरपूर पैसे कमावले. जवान हा चित्रपट खूप गाजला होता. या चित्रपटासाठी त्याच्याबरोबर नयनतारा, सान्या मल्होत्रा, विजय सेतुपती, आश्लेषा ठाकूर, रिद्धी डोगरा आणि बरेच कलाकार दिसले आहेत. जवान चित्रपटाचं दिग्दर्शन ॲटली कुमार यांनी केलं आहे.

## 'अयोध्यातील राम मंदिर बॉम्बने उडवायचेय', बीडच्या तरुणाला पाकिस्तानातून ऑफर



**बीड/प्रतिनिधी :** बीड जिल्ह्यातील शिरुर कासार तालुक्यातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. येथील एका तरुणाला सोशल मीडियावर अयोध्यातील राम मंदिर बॉम्बने उडवून देण्याची ऑफर देण्यात आली आहे. संबंधित म ेसेज पाकिस्तानच्या कराचीमधून एका संशयिताने पाठवला आहे. त्यात अयोध्येतील श्रीराम मंदिर आरडीएक्सने उडवून देण्याची धमकी देण्यात आली आहे. याप्रकरणी शिरूर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मेसेज पाठवणाऱ्या संशयिताने आपण पाकिस्तानी असल्याचे सिद्ध करण्यासाठी आपले कराचीमधील लोकेशनही तरुणाला पाठवले. एवढेच नाही, तर या कटात सहभागी होण्यासाठी त्याने १ लाख रुपयांची ऑफर दिली. ''या कामासाठी आपल्याला ५० लोक हवे आहेत. प्रत्येकाला १ लाख रुपये दिले जातील आणि मंदिर उडवण्यासाठी आरडीएक्सही पुरवले जाईल,'' असं संशयिताने मेसेजमध्ये म्हटले आहे.

संशयिताने ऑडिओ क्लिपमध्ये म्हटलं की, ''सोचके बताओ, हमारा साथ दो, मूंह खोल तुझे अमाउंट चाहिये. हमे अयोध्या का मंदिर आरडीएक्स से उत्रडाना है. इस काम के लिए हमे पचास बंदे चाहिये, आरडीएक्स पोहोच जायेगा. जो बंदे काम करेंगे उनको एक-एक लाख मिलेगा.' जर तू करू शकणार नसशील तर दुसरा कुणाचा नंबर देऊ शकतो.., असंही समोरील व्यक्तीने सांगितलं.

आता ही मेसेजवरील व्यक्ती नक्की कोण आहे? ती खरीच पाकिस्तानची रहिवासी आहे का? त्यांचा राम मंदिरवण्याचा डाव आहे का? असे अनेक प्रश्न सध्या अनुत्तरित आहेत. या प्रकरणी शिरूर कासार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सध्या पोलीस या प्रकरणाचा सविस्तर तपास करत आहेत. मेसेज पाठवणारा व्यक्ती खरोखरच पाकिस्तानचा आहे का, हे तपासानंतरच स्पष्ट होईल. पण एका भारतीय तरुणाला अशाप्रकारे पाकिस्तानमधून ऑफर दिल्याने एकच खळबळ उडाली आहे.

## महादेवी हत्तीणीसाठी कोल्हापूरकरांची स्वाक्षरी मोहीम; २ लाख ४ हजार ४२१ नागरिकांच्या स्वाक्षऱ्या घेऊन राष्ट्रपतींना पाठवली पत्र





**दैनिक आपला विदर्भ**

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** न्यायालयाच्या आदेशानुसार नांदणी येथील स्वस्तिश्री भट्टारक पट्टाचार्य महास्वामी मठातील महादेवी हत्तीण गुजरातच्या वनतारा येथे पाठवण्यात आली आहे. मात्र त्यानंतर या हत्तीणीला कोल्हापूरला परत आणण्यासाठी जनभावना उसळली आहे. अनेक लोकप्रतिनिधी या हत्तीणीला परत आणण्यासाठी प्रयत्नशील आहे. काँग्रेसचे विधान परिषदेतील आमदार सतेज पाटील यांनीही यासाठी स्वाक्षरी मोहीम सुरु केली होती. या मोहिमेला कोल्हापूर जिल्ह्यासह देशभरातील तब्बल सव्वा दोन लाख नागरिकांनी सहभाग देत महादेवी हत्तीण नांदणी मठातच राहावी, अशी मागणी केली आहे. अवघ्या २ दिवसांत या स्वाक्षरी मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याने शनिवारी सकाळी या सर्व सह्यांच्या फॉर्मचे नांदणी मठात पूजन करून, ही सर्व पत्रे आमदार सतेज पाटील आणि माजी आमदार ऋतुराज पाटील यांच्या उपस्थितीत रमणमळा पोस्ट ऑफिस येथून राष्ट्रपतींना पाठवण्यात आली. यावेळी हत्तीप्रेमी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

# पृथ्वीवर पाऊल ठेवणारा पहिला माणूस कोण होता?

## शास्त्रज्ञांच्या संशोधनातून उलगडलं आश्चर्यचकित करणारं रहस्य!

नवी दिल्ली: पृथ्वीवर मानवजात कशी आणि केव्हा उदयास आली? याबद्दल अनेकांच्या मनात उत्सुकता असते. शास्त्रज्ञांनी लाखो वर्षांपूर्वीच्या या रहस्याचा उलगडा केलाय. आणि त्यांचे निष्कर्ष तुम्हाला थक्क करणारे आहेत! मानवी उत्क्रांतीचा हा प्रवास आफ्रिकेपासून सुरू झाला, आणि त्यातून मानवजात आजच्या आधुनिक स्वरूपात विकसित झाली. या आश्चर्यकारक कहाणीचा तपशील जाणून घेऊया.

वैज्ञानिक संशोधन सांगते की मानवजातीचा उगम सुमारे ६ ते ८ दशलक्ष वर्षांपूर्वी आफ्रिकन खंडात झाला. या काळात आपले पूर्वज माकडांपासून वेगळे होऊन हळूहळू उत्क्रांत होत गेले. लाखो वर्षांच्या या प्रक्रियेत मानवाने आपले स्वरूप, बुद्धिमत्ता आणि कौशल्ये विकसित केली, जी आजच्या आधुनिक म ानवापर्यंत पोहोचली.

शास्त्रज्ञांच्या मते, पृथ्वीवर पाऊल ठेवणारा पहिला मानव 'होमो हॅबिलिस' होता, ज्याचा अर्थ आहे 'कुशल मानव'. सुमारे २८ लाख वर्षांपूर्वी आफ्रिकेत उदयास आलेल्या या प्रजातीचे अवशेष टांझानिया आणि इथिओपियात सापडले आहेत. हे अवशेष मानवी इतिहासातील म हत्त्वाचे दुवे मानले जातात, ज्यांनी मानवजातीच्या विकासाचा पाया रचला. होमो हॅबिलिस खास होता कारण तो दोन पायांवर चालू शकत होता. या क्षमतेमुळे त्याला लांब अंतर पार करणे, शिकार करणे आणि स्वत:चे संरक्षण करणे शक्य झाले. याच क्षणापासून मानवजातीच्या जीवनाचा एक नवा अध्याय सुरू झाला, ज्याने पुढील प्रगतीचा मार्ग मोकळा केला.हत्यारांचा शोध:

होमो हॅबिलिसने दगडी हत्यारांचा शोध लावला, ज्यामुळे त्यांचे जीवन नाटकीयरित्या बदलले. ही हत्यारे शिकार, अन्न तयार करणे आणि स्वसंरक्षणासाठी वापरली गेली. या साधनांनी मानवाच्या तंत्रज्ञान आणि जीवनशैलीत क्रांती घडवली, ज्याने आधुनिक मानवाच्या विकासाला गती मिळाली. सुमारे ३ लाख वर्षांपूर्वी आफ्रिकेत 'होमो सेपियन्स'चा उदय झाला, ज्यांना आजच्या आधुनिक म ानवांचे थेट पूर्वज मानले जाते. त्यांची सर्वात मोठी खासियत होती त्यांची प्रगत बुद्धिमत्ता आणि सामाजिक बांधणी. याच गुणांमुळे मानवजात संस्कृती आणि सभ्यतेच्या दिशेने वाटचाल करू शकली.आग आणि

होमो सेपियन्सने आगीचा वापर शिकून घेतला आणि भाषेचा विकास केला. या दोन गोष्टींमुळे मानवांना गटांम ध्ये राहणे, परस्परांशी संवाद साधणे आणि संस्कृती निर्माण करणे शक्य झाले. यामुळे मानवजात सभ्यतेच्या नव्या उंचीवर पोहोचली, आणि हा टप्पा मानवी इतिहासात मैलाचा दगड ठरला. मानवी उत्क्रांती ही एक सतत चालणारी प्रक्रिया आहे. होमो हॅबिलिसपासून होमो इरेक्टस आणि नंतर होमो सेपियन्सपर्यंत, प्रत्येक प्रजातीने मानवजातीच्या विकासात नवे आयाम जोडले. या प्रजातींनी बुद्धिमत्ता, तंत्रज्ञान आणि सामाजिक कौशल्ये यांचा विकास करत म ानवाला आजच्या स्वरूपात आणले. जगभरात सापडलेले हाडांचे अवशेष आणि प्राचीन अवजारे मानवजातीच्या उत्क्रांतीची कहाणी सांगतात. पुरातत्व आणि जीवशास्त्राच्या संशोधनामुळे आपल्याला मानवाने लाखो वर्षांत कशी प्रगती केली, हे समजते. या अवशेषांनी मानवाच्या बुद्धिमत्ता, वर्तन आणि तंत्रज्ञानाच्या विकासाचा पडदाफाश केला आहे.

पृथ्वीवरील पहिला माणूस कोण होता?, याचे उत्तर होमो हॅबिलिसपासून सुरू होऊन होमो सेपियन्सपर्यंत जाते. शास्त्रज्ञांचे संशोधन आणि पुरातत्वीय शोध यांनी मानवजातीच्या उत्पत्तीची आणि विकासाची ही रोमांचक कहाणी उलगडली आहे. हा प्रवास आजही आपल्याला आश्चर्यचकित करतो आणि मानवजातीच्या भविष्याबद्दल नव्या प्रश्नांना जन्म देतो!

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# हिंदुत्वावर आरोप करणाऱ्याला त्याची किंमत चुकवावी लागेल

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा विरोधकांवर प्रहार

दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी :** भगवा दहशतवाद, भगवा आतंकवाद असे आरोप ज्यांनी केले, त्या आरोपावर अशा प्रकारच्या घटना शिक्कामोर्तब करणाऱ्या ठरतात. हिंदुत्वावर आरोप करणाऱ्याला त्यांची किंमत चुकवावी लागेल, असा इशारा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माध्यमांशी बोलताना विरोधकांना दिला. यावेळी उपमुख्यमंत्री म्हणाले की, या पूर्वी देखील एका रिटायर्ड पोलीस ऑफिसर ने या मालेगाव प्रकरणांमध्ये मोहन भागवत यांचे नाव घ्या, असे प्रकारचे टॉर्चरिंग देखील केले होते. अशा प्रकारचे स्टेटमेंट एका रिटायर्ड पोलीस ऑफीसर देणे ही दुर्दैवी बाब आहे. साध्वी प्रज्ञा यांनी प्रधानमंत्री मोदी यांचे नाव घ्यावे, यासाठी त्यांना टॉर्चरिंग केले, त्यांचे हाल केले, त्यांना मोठ्या प्रमाणावर त्रास दिला, अशा प्रकारचा स्टेटमेंट हे अतिशय दुर्भाग्यपूर्ण आहे. – तत्कालीन काँग्रेस सरकार ही काँग्रेसचे नेते आहे. हिंदुत्वाच्या विरोधात हिंदुत्वाचा अपमान करणं फक्त मतांच्या राजकारणासाठी कुठल्या थराला ते जाऊ शकतात, याचे मूर्तीमंत उदाहरण आहे. तत्कालीन राज्यकर्ते होते ते म्हणत होते दहशतवादाला कुठलाही रंग नसतो, कुठलाही धर्म नसतो, पण याच लोकांनी मालेगाव ब्लास्ट मध्ये सांगितले की, हा भगवा आतंकवाद आहे. भगवा दहशतवाद आहे. त्यामध्ये जे हिंदुत्ववादी लीडर होते, त्या लोकांना जबरदस्ती दबाव निर्माण केला. तपास यंत्रणांवर हे अतिशय दुर्दैवी आहे. ज्या लोकांनी अशा प्रकारचा दबाव निर्माण केला. खोट्या केसेस मध्ये बॉम्ब ब्लास्ट मध्ये ज्यांचे नाव घेण्याचा मोहन भागवत असतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी असतील, हे कट्टर देशभक्त आहेत. हे देशाला पुढे नेणारे व्यक्तिमत्व आहेत. अशा व्यक्तिमत्त्वावर आरोप करून, खऱ्या अर्थाने भगवा दहशतवाद सिद्ध करण्याचा मनसुबा, कारस्थान, षडयंत्र, तत्कालीन काँग्रेस सरकारने रचला होता. या लोकांनी तमाम हिंदू धर्मियांची माफी मागितली पाहिजे. अशा प्रकारचा दुर्दैवी राजकारण कधीही झालं नव्हते. या लोकांनी या तपास यंत्रणेवर दबाव टाकला होता. त्यांची चौकशी झाली पाहिजे, त्यांच्यावर कठोर कारवाई झाली पाहिजे. त्यांची नार्को टेस्ट झाली पाहिजे. आणि दूध का दूध पाणी का पाणी झाले पाहिजे.यांचा खरे चेहरे देशातल्या जनतेसमोर आले पाहिजे.



असे मत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केले.

# महादेवी माधुरी हत्ती वापस द्या

## माजी मंत्री सुबोध सावजी यांची मागणी : डोणगाव येथे आज मूक मोर्चा

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** कोल्हापूर जिल्ह्यातील नांदणी मठातील दिगंबर जैन समाजाचे धार्मिक प्रतीक असलेल्या महादेवी माधुरी हतीन कोर्टाच्या आदेशाने गुजरात मध्ये वनतारा प्राणी संग्रहालयात नेण्यांत आली आहे. त्यामुळे जैन बांधवांच्या भावना दुखावल्या आहेत. समस्त जैन बांधवांच्या भावना लक्षात घेता महादेवी माधुरी हत्तीन कोल्हापूर येथील मठात परत द्यावी अशी मागणी माजी मंत्री सुबोध सावजी यांनी केली आहे.तसेच याबाबत डोणगाव येथे मूक मोर्चा काढण्यात येणार असल्याचे डोणगाव पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे.



सदर निवेदनात नमूद केले आहे की, कोल्हापूर जिल्ह्यातील नांदणी मठातील दिगंबर जैन समाजाचे धार्मिक प्रतीक महादेवी माधुरी हत्तीन कोर्टाच्या आदेशाने गुजरात मध्ये वनतारा प्राणी संग्रहालय नेण्यात आली आहे.यामुळे सर्व जैन बांधवांच्या व मंदीरात असता असणाऱ्यांच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत. त्यामुळे महादेवी माधुरी हत्तीन वापस त्याच मठात देण्यात यावी, यासाठी राष्ट्रपती यांनी मध्यस्थी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

सदर मागणीसाठी ३ ऑगस्ट रोजी डोणगाव येथील जैन मंदिर येथून मूकमोर्चा काढण्यात येणार असून हा मूकमोर्चा व्हाय टी चौक ते श्रीराम मठ ते सावजी जैन वस्तीतून शेलगाव पार ते लहरु चौक पुढे जैन मंदिरा पर्यंत काढण्यात येणार आहे. असेही डोणगाव पोलीस स्टेशनचे अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे. निवेदनावर माजी मंत्री सुबोध सावजी, ओमप्रकाश आंबेकर, सुधीर बोराळकर, प्रदीप आंबेकर, आर्यन जोगी, रितेश सवंगई, तुषार मैंद, जयचंद बोराळकर, विलास आंबेकर, प्रकाश धांगडे, विकास काळे, मधुकर बोराळकर यांच्यासह शेकडो नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# सरकार भ्रष्टाचारी आहे; सरकारने शेतकऱ्यांना फसवले – आमदार जितेंद्र आव्हाड

दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी :** सरकार भ्रष्टाचारी आहे. सरकारने शेतकऱ्यांना फसवले. मंत्री सत्तेचा माज असल्यासारखे वागतात. यात काय चुकीचे बोलत आहोत. हे जर अर्बन नक्षल असेल तर, आम्हाला अटक करा. असे मत आमदार जितेंद्र आव्हाड यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे भेट ही चर्चा नेहमी चांगलीच होते, रिझल्ट मात्र येत नाही. पुण्यात दादागिरी कोणाचे चालते, ते देखील हसत उत्तर देऊ शकले नाही. ज्ञानेश्वरी मुंडे यांना मुख्यमंत्र्यांनी जसे बोलून घेतले, त्यांचे म्हणणे काय ते ऐकून घेतल पाहिजे. उपमुख्यमंत्र्यांच्या ठाण्यामध्ये ते कुटुंब राहत आहे. ५ वर्ष ते लढत आहेत. एकनाथ शिंदे यांनी माणुसकीने त्या पोरींच्या बापाचे काय झाले ? हे त्यांना विचारावे. पण वाटत मी मुख्यमंत्री व्हावे, मी ही रात्री स्वप्न बघत असतो. स्वप्न बघणार नैसर्गिक अधिकार आहे. यवत प्रकरणाची



पूर्ण चौकशी करावी.यवत मध्ये कोण गेलं? कोणी घोषणा दिल्या? त्या सर्वांची चौकशी व्हावी. नाव बाहेर येत आहे. कोणी काय केले? कोणी मस्ती केले? कोणी घोषणा दिल्या? सत्ताधारी पक्षातील लोक जर दंगे जाऊन करत असतील, तर सरकारचे नाव बदनाम होत आहे. हे सरकार नालायक आहे. हे जर अर्बन नक्षलवाद असेल, तर मला अटक करा. सरकार भ्रष्टाचारी आहे. सरकारने शेतकऱ्यांना फसवले. मंत्री सत्तेचा माज असल्यासारखे वागतात. यात काय चुकीचे बोलत आहोत. हे जर अर्बन नक्षल असेल तर, आम्हाला अटक करा. असे मत आमदार जितेंद्र आव्हाड यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

# महाराष्ट्रातील सर्व जाती धर्म, सर्व भाषांना आपण सहकार्य केले पाहिजे : अजित पवार

**रायगड/प्रतिनिधी :** पुणे आणि महाराष्ट्रात आम्ही इंडस्ट्रीत दादागिरी खपवून घेणार नाही, पुणे ग्रामीण एस.पी. यांना सूचना दिल्या आहेत. अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी माध्यमांशी बोलताना दिली.



यावेळी ते म्हणाले की, कोणत्याही पक्षाच्या लोकांनी दादागिरी केल्यास किंवा कोणी अडचणी आणत असतील तर, त्यांच्यावर गुन्हे दाखल करावेत, तरीही कुणी न ऐकल्यास त्यांच्यावर मोकोका दाखल करण्याच्या सूचना दिल्या आहेत. महाराष्ट्रातील उद्योगपतींना उद्योग वाढीस प्रोत्साहन दिले पाहिजे

कायदा व्यवस्था राखण्याचे काम आमंच आहे, महायुती सरकार ते काम पार पाडणार पृथ्वीराज चव्हाण आज आमदार नाहीत, कुठेही लोकप्रतिनिधी नाहीत, महाराष्ट्रात कोण काय बोलतो काय नाही असं तुम्ही प्रश्न विचारत असतात. महाराष्ट्रातील सर्व जाती धर्म, सर्व भाषा, सर्व प्रांत सर्व पंथ यांना आपण सहकार्य केले पाहिजे, ज्या त्या राज्यात असलेल्या मातृभाषेला आपण प्राधान्य दिले पाहिजे असे मत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

# मेहकर व लोणार तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करून आर्थिक मदत द्या अन्यथा आंदोलन

## संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष पांडुरंग पाटील यांचा पालकमंत्र्यांना निवेदनाद्वारे इशारा

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** मेहकर व लोणार तालुक्यामध्ये जून व जुलै महिन्यात सततच्या अतिवृष्टीने पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. त्यामुळे मेहकर व लोणार तालुक्यांमद्ये ओला दुष्काळ जाहीर करून शेतकयांना भरीव आर्थिक मदत करावी, अशी मागणी संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष पांडुरंग अमृतराव पाटील यांनी बुलढाणा पालकमंत्री मकरंद पाटील यांना २ ऑगस्ट रोजी निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात नमुद केले आहे की, बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर व लोणार या दोन तालुक्यामधे २५ व २६ जून तसेच २३ व २४ जुलै २०२५ रोजी ढगफुटीसदृष्य पाऊस पडल्यामुळे खरीप हंगामातील पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. त्याचबरोबर शेतजमीनी प्रचंड प्रमाणात खरडून गेली आहे. त्यामुळे शेतजमीनींचे न भरुन निघणारे नुकसान झाले आहे. काही ठिकाणी शेतकयांनी दुसया व तसयांदा शेतांची पेरणी केली आहे. परंतु, आता पिकांचा पेरणीचा कालावधी चुकल्यामुळे पिकांचे सरासरी पेक्षा खुप कमी उत्पन्न होणार आहे.

त्यामुळे सदर दोन तालुक्यांतील शेतकयांचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले आहे. त्यामुळे सदर दोन तालुक्यांमध्ये त्वरित ओला दुष्काळ जाहीर करुन शेतकयांना आधार द्यावा आपण जिल्ह्याचे पालकमंत्री या नात्याने जिल्ह्यासहीत सदर दोन तालुक्यांतील शेतकरी आपल्याकडे आशा लावून बसलेला आहे. शेतकयांच्या संवेदना लक्षात घेवून शेतकयांना न्याय द्यावा. तसेच जिल्ह्यातील प्रलंबीत पिकविम्याचा मोबदला देण्यात यावा, अन्यथा हजारो शेतकर्यांना सोबत घेत संभाजी ब्रिगेडच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष पांडुरंग अमृतराव पाटील यांनी बुलढाणा पालकमंत्री मकरंद पाटील यांना २ ऑगस्ट रोजी निवेदनाद्वारे दिला आहे.

# वसंतराव नाईक शेती स्वालंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलांडे (पाटील) यांचा जिल्हा दौरा

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** कै. वसंतराव नाईक शेती स्वालंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलांडे (पाटील) हे बुधवार दि. ६ ऑगस्ट २०२५ रोजी बुलढाणा जिल्हा दौऱ्यावर येत आहे. त्यांचा दौरा कार्यक्रम याप्रमाणे.

बुधवार दि. ६ ऑगस्ट रोजी दुपारी ३ वाजता विश्रामगृह संग्रामपुर येथे आगमन व तहसिलदार, गटविकास अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, बालविकास प्रकल्प अधिकारी यांच्या समवेत तालुक्यातील शेतकरी आत्महत्या व चारा लागवड यासंबंधी चर्चा. दुपारी ३.३० वाजता तहसिलदार, संग्रामपूर यांनी निश्चित केलेल्या शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबास भेट. तद्नंतर तहसिलदार संग्रामपूर यांनी निश्चित केलेल्या प्रस्तावित चारा लागवडीचे ठिकाणास भेट व पाहणी. सायं. ५ वाजता विश्रामगृह, शेगांव, जि. बुलढाणा येथे आगमन व तहसिलदार, गटविकास अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, बालविकास प्रकल्प अधिकारी यांच्या समवेत तालुक्यातील शेतकरी आत्महत्या व चारा लागवड यासंबंधी चर्चा. ५.१५ वाजता तहसिलदार, शेगांव यांनी निश्चित केलेल्या शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटूंबास भेट. तद्नंतर तहसिलदार शेगांव यांनी निश्चित केलेल्या प्रस्तावित चारा लागवडीचे ठिकाणास भेट व पाहणी. सायंकाळी ७ वाजता विश्रामभवन, शेगांव येथे आगमन व मुक्काम.

गुरुवार दि.७ ऑगस्ट रोजी सकाळी १०.३० वाजता बाळापुर जि.अकोलाकडे प्रयान करतील.

# भा. मा. कन्या शाळेत टिळक व अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी

दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी :** येथील भारत माध्यमिक कन्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालयात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक व साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०५ वी जयंती साजरी करण्यात आली प्राचार्या मंजुषा सु. देशमुख पर्यवेक्षक सुनील डहाळके ज्येष्ठ शिक्षिका मंगला शेटे व प्रा. गुलाब साबळे यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन आणि हार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली त्यानंतर लोकमान्य बाळ गंगाधर टिळक व साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकणारी भाषणे,पोवाडे,गीत विद्यार्थिनींनी सादर केले त्यामध्ये आरती साळवे, जान्हवी कांबळे, अनन्या वाठोरे,गायत्री गर्जे,पूजा जाधव, समृद्धी मोरे,सिद्धी खोडके, कोमल पोपळघट, कीर्ती कराड, योगिता पुरी, वर्षा गुंजाळ, प्रतीक्षा फुंदसे, श्रावणी खाडे, वैष्णवी मोरे, श्रुती खामकर, आकांक्षा घुगे, साक्षी लाटे, अक्षरा लोखंडे, राधिका हाडे, समृद्धी खडसे, भारती गव्हाणे, मान्यता भोसले, गायत्री वामन, साक्षी मुंडे, श्रावणी खराटे, दुर्गा डोरले, कविता टाकरस, स्नेहा मुंजे, भाविका भोपाळे, मोनू गवळी, वैष्णवी शेळके, तनिष्का खिल्लारे, श्रुती घोडे, दिपाली गरकळ ,ईश्वरी




खोडे ,सेफीन शेख, प्रगती सुरकुटे, सेजल टिकाइत ,वैभवी मोरे, श्रद्धा जहिरव ,ईश्वरी उपाड, अपूर्वा मोरे ,प्राजक्ता भोसले ,चेतना देशमुख ,संस्कृती पावडे ,स्नेहा मुंजे, मान्यता भोसले ,समृद्धी मोरे ,या विद्यार्थिनीनी आपले विचार व्यक्त केले मंचावरील उपस्थितानी दोन्ही महापुरुषाच्या जीवनावर प्रकाश टाकला प्राचार्या मंजुषा सु.देशमुख यांनी लोकमान्य बाळ गंगाधर वकील पत्रकार समाज सुधारक साहित्यिक विचारवंत होते. तसेच मराठी साहित्यामध्ये सोनेरी अक्षरांनी ज्यांचे नाव लिहावं असे साहित्य सम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे म्हणजे मराठी साहित्याला एक मोठी देण होय. त्यामध्ये ३५ कादंबऱ्या १५ लघु कथा १२ पटकथा १४ लोकनाट्य कित्येक पोवाडे एक प्रवास वर्णन हा मराठीतील अमूल्य खजिना अण्णाभाऊंनी आपणाला बहाल केला असा मराठी साहित्यातील कोहिनूर हिरा यांच्या जयंतीनिमित्त त्यांना आपल्या विचारातून अभिवादन केले. सूत्रसंचालन प्राध्यापिका साधना बोरकर तर आभार मंगला शेटे यांनी मानले.

## संक्षिप्त...

### गणेश नाईक-मंदा म्हात्रे वाद पुन्हा चव्हाट्यावर




**नवी मुंबई/प्रतिनिधी :** नवी मुंबईतील बेलापूरमध्ये हॉस्पिटल व्हावे म्हणून बेलापूर आमदार मंदा म्हात्रे प्रयत्न करत आहेत. मात्र, त्या जागेवर खेळाचे मैदान असावे म्हणून नवी मुंबईतील नागरिकांची मागणी आहे. काल त्याच जागे संदर्भात कोर्टात दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी होऊन कोर्टाने जिल्हाधिकारी, महापालिकेला नोटीस काढली असून संबंधित जागा सीआरझेड मध्ये येत आसल्याने ४ ऑगस्टला पाहणी करून निर्णय घेण्यास सांगितला आहे. आज त्याच संदर्भात आमदार मंदा म्हात्रे यांनी वन मंत्री गणेश नाईक यांनीच अशी नोटीस काढायला लावली असल्याचा आरोप करत गणेश नाईक यांचे वय काढले. मंदा म्हात्रे यांनी बोलताना गणेश नाईक यांचे वय झाल्याने त्यांना काय करावे समजत नाही. मात्र, आपण रुग्णालय व्हावं यासाठी कायम प्रयत्न सुरू ठेवणार असल्याचे सांगितले. मंदा म्हात्रेंनी केलेल्या टीकेमुळे गणेश नाईक आणि मंदा म्हात्रे वाद पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे.

### वोट चोरी संदर्भात राहुल गांधींचे वक्तव्य अत्यंत दुर्दैवी; अतुल सावे यांची प्रतिक्रिया



**धुळे/प्रतिनिधी :** धुळे जिल्ह्यातील पालकमंत्री जयकुमार रावल यांच्या वाढदिवसा निमित्त विकास कामांच्या लोकार्पणासाठी राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण विभाग, दुग्धविकास, अपारंपारिक उर्जा, दिव्यांग कल्याण विभाग मंत्री अतुल सावे आणि वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकार यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये विविध लोकार्पणसह ऑक्सिजन प्लांटचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी मंत्री अतुल सावे यांनी काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांनी मतदानात चोरी होत असल्याचा आम्हाला मध्य प्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगड विधानसभा निवडणुकांच्या वेळी संशय आला होता. महाराष्ट्रात तो संशय जास्त गडद झाला. मतदानाची चोरी करण्यासाठी निवडणूक आयोगाने भाजपला मदत केली असा आरोप संसदेत केला होता या आरोपाला प्रत्युत्तर देत मंत्री अतुल सावे यांनी सांगितले की, लोकसभेमध्ये काँग्रेसचे जास्त खासदार निवडून आले त्यावेळेस त्यांना वाटले नाही का मताची चोरी झाली आहे.आज पराभव डोळ्यासमोर दिसत असताना राहुल गांधींनी असं वक्तव्य करणे अत्यंत दुर्दैवी आहे असे म्हणत पलटवार मंत्री अतुल सावे यांनी केला आहे.

### माणिकराव कोकाटे व आमदार संजय गायकवाड यांच्या विरोधात क्रांती चौकात आंदोलन

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** माणिकराव कोकाटे यांच्या विरोधात विरोधकांकडून घोषणाबाजी केली जात आहे. त्याचबरोबर पत्ते खेळून त्यांचा निषेध व्यक्त करण्यात येत आहे. शेतकऱ्यांना कर्जमाफी झालीच पाहिजे, पत्ते खेळत हे आंदोलन सुरू आहे. जोरदार घोषणाबाजी क्रांती चौकामध्ये केली जात आहे. कर्जमाफी झालीच पाहिजे कर्जमाफी होत कशी नाही, अशी मागणी या ठिकाणी केली जात आहे.आमदार संजय गायकवाड आणि माणिकराव कोकाटे यांच्या विरोधात आंदोलन केले जात आहे. अशी माहिती अध्यक्ष चंद्रकांत भराट यांनी दिली.

### दक्षिण काश्मीरमध्ये आणखी एक दहशतवादी ठार, आठवड्याभरात दुसरी चकमक

श्रीनगर: जम्मू आणि काश्मीरमधील दक्षिण काश्मीरमधल्या कुलगाम जिल्ह्यातील अखल गावात शुक्रवारी रात्री झालेल्या चकमकीत एक अज्ञात दहशतवादी ठार झाला आहे, अशी माहिती भारतीय लष्कराने शनिवारी दिली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये ही चकमक शुक्रवारी कुलगाम जिल्ह्यात सुरू झाली. एका पोलीस अधिकाऱ्याने सांगितले की, दक्षिण काश्मीरम धील अखल जिल्ह्यातील जंगली भागात दहशतवादी लपले असल्याची गुप्त माहिती मिळाल्यानंतर सुरक्षा दलांनी परिसराला वेढा घातला आणि शोध मोहीम सुरू केली. ही चकमक शुक्रवारी सायंकाळपासून सुरू झाली.

**जिल्ह्याच्या भाळी निष्ठूर पालकत्व**

# शेतकरी अतिवृष्टीने उध्वस्त झाल्यानंतर तब्बल महिन्याभराने
# पालकमंत्री मकरंद पाटील यांना आली जाग

दैनिक आपला विदर्भ





**मेहकर :** नैसर्गिक संकटाने सैरावैरा झालेल्या जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पालकत्व या नात्याने जिल्ह्याचे पालकमंत्री मकरंद पाटील यांनी भेट घेऊन झालेल्या नुकसानीचे पाहणी करून आधार देण्याची गरज होती. मात्र, जिल्ह्याच्या भाळी निष्ठूर पालकत्व लादल्याने जिल्ह्यातील जनता सैरावैरा झाली आहे. अतिवृष्टीने मेहकर लोणार तालुक्यातील हजारो हेक्टर जमीन खरडून गेल्याने व शेकडो घरे अतिवृष्टीने उध्वस्त झाल्याने शेतकरी व नागरिकांना पालकमंत्री मकरंद पाटील यांनी आधार देण्याची गरज होती. मात्र शेतकऱ्याकडे दुर्लक्ष असलेल्या पालकमंत्री मकरंद पाटील यांच्याबाबत मेहकर लोणार तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात टीकेचा भडीमार झाला. त्यानंतर पालकमंत्र्यांना जाग आली आणि मेहकर लोणार तालुक्यात येत शेतकरी हिताचा आव आणत एका शेतकऱ्याच शेतात जाऊन पाच मिनिटात पाहणी करून शेतकरी हिताचा ड्रामा.? अत्यंत निष्ठूर असलेल्या या पालकत्वाबाबत जिल्ह्यात मेहकर लोणार तालुक्यासह जिल्ह्यात टीका करून रोज व्यक्त केली जात आहे.

शेतकरी व मतदारांना विविध प्रकारच्या आश्वासन देत महायुतीने सत्ता हस्तगत केली. त्यानंतर काही दिवसातच महायुतीच्या मंत्र्यांनी शेतकरी व गोरगरीब यांना त्यांची जागा दाखवण्याची एकही संधी सोडली नाही. कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी शेतकऱ्यांना भिकारी म्हणून शेतकऱ्यांची खिल्ली उडविली. तर मंत्रालयात शेतकऱ्यांच्या हिताचे प्रश्न उपस्थित करण्याऐवजी रमी खेळण्यात धन्यता मानली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांना कर्जमाफी देऊ असे आश्वासन दिले होते. मात्र, अजून ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांची कर्जमाफी केली नाही आणि शेतकऱ्यांच्या मालाला भावही दिला नाही.

एकंदरीत महायुती सरकार ही शेतकऱ्यांची शोषण करणारे सरकार असल्याचे टीका सर्वत्र होत असताना आहे. याचा शेतकऱ्यांना वेळोवेळी अनुभव आला आहे. बुलढाणा जिल्ह्यातील कृषी पुरस्कार प्राप्त शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्यानंतर त्याच्या कुटुंबाला मुलांना दत्तक घेण्याचे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले होते. मात्र ते आश्वासनं आश्वासनच..? गत महिन्यात २५ व २६ जून रोजी झालेल्या अतिवृष्टीने डोणगाव सह मेहकर लोणार व इतर तालुक्यात हजारो हेक्टर जमीन खरडून गेली. शेतकऱ्यांनी पेरणी केलेले पीक वाहून गेले. गेल्या पन्नास वर्षात कधी नव्हे एवढा पाऊस या गत वर्षांत पडला. अतिवृष्टीने जमिनीचे वाळवंट झाले.

यावर्षीच नव्हे तर पुढील पाच वर्ष शेती कसल्या लाईक याचे शाश्वत नाही. त्यामुळे हतबल झालेला शेतकरी मायबाप शासनाच्या मदतीकडे आस लावून बसलेला आहे. पालकमंत्री मकरंद पाटील यांनी आपल्या पालकत्वाची जाण ठेवून मेहकर तालुक्यातील डोणगाव तसेच लोणार तालुक्यातील अतिवृष्टी ग्रस्त भागातील शेतकऱ्यांना भेट देऊन त्यांना आर्थिक मदत करण्याबरोबरच मानसिक आधार देण्याची गरज होती.

पालकमंत्री येथील नुकसानग्रस्त भागाची पाहणी करतील व जिल्हा प्रशासनाला याबाबत सूचना देऊन शेतकऱ्यांना भरीव आर्थिक मदत देण्याची घोषणा करतील अशी अपेक्षा शेतकऱ्यांना होती मात्र पालकत्व स्वीकारलेल्या निष्ठुर मंत्र्याला नुकसानग्रस्त भागाची नुकसान झाल्यानंतर पाहणी करण्याची ही भान राहिले नाही. पालकमंत्र्याबाबत डोणगाव मेहकर तालुक्यातील डोणगाव व लोणार तालुक्यातील शेतकऱ्यांनी टीकेचा भडीमार सुरू केला. त्यानंतर पालकमंत्र्याच्या चलेच्यापाटने सदरबाब पालकमंत्र्याच्या कानावर घातली त्यानंतर पालकमंत्री मकरंद पाटील यांनी शेतकरी हिताचा आव.?

अतिवृष्टी भागाची पाहणी दौरा केला. त्यामध्येही पाहणी दौऱ्यातही पालकमंत्र्याचे..... प्रेम दिसून आले. शेतकरी प्रति कोणतेही सहानुभूती नसलेल्या पालकमंत्र्यांनी एका शेतात जाऊन पाच मिनिटांसाठी फोटो सेशन केले आणि आपण शेतकऱ्यांच्या किती कैवारी आहो हे दाखवून देण्याचा ड्रामा.? यावेळी शेतकऱ्यांना भरीव आर्थिक मदत करण्याची घोषणा पालकमंत्री करतील अशी अपेक्षा शेतकऱ्यांना होती. मात्र, निष्ठूर पालकमंत्र्यांचे जीववार आल्यासारखा दौरा करून शेतकऱ्यांना जबरदस्तीचा राम राम केला. पालकमंत्र्यांच्या शेतकऱ्या प्रती असलेल्या प्रेमाबाबत मात्र, उलट सुलट चर्चा सुरू झाली असून पालकमंत्र्यांवर टीकेचा भडीमार सुरू झाला आहे.मात्र आपल्या सत्तेत मग्न झालेल्या जिल्ह्याच्या पालकमंत्र्याला शेतकऱ्यांच्या दुःखाचे कोणतेही सोयर सुतक नसल्याचे चित्र पालकमंत्र्याच्या दौऱ्यावरून दिसून आले असल्याचा आरोप शेतकरी करीत आहेत.

## पालकमंत्री आले आणि गेले



डोणगाव परिसरात जून व जुलै महिन्यात झालेल्या अतिवृष्टीने हजारो एकर शेती खरडून गेली आहे. हजारो हेक्टर जमिनीवर दुबार पेरणी करण्याची वेळ शेतकऱ्यावर आली. नदीकाठी जमीन तर पूर्ण वाळवंट झाली आहे. नैसर्गिक संकटांनी शेतकरीवर्ग हतबल झाला असताना पालकमंत्री या नात्याने जिल्ह्याचे पालकमंत्री मकरंद पाटील यांनी नुकसानग्रस्त भागाची पाहणी तात्काळ करून शेतकऱ्यांना विना विलंब मदत देण्याची गरज होती. मात्र, सत्तेत रमलेल्या पालकमंत्री मकरंद पाटील यांना शेतकऱ्यांची भेट घेण्याची ही सत्तासुंदरी पुढे आठवण राहिली नाही. याबाबत सर्वत्र टीका सुरू झाली असताना पालकमंत्र्याच्या चलेचट्याने सदर ही बाब पालकमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली असावी. त्यानंतर तब्बल महिन्याभराने पालकमंत्र्यांनी दुष्काळग्रस्त भागाचा दौरा करत फोटोसेशन केले. केवळ पाच मिनिटांसाठी शेतात गेले आणि निघून गेले पालकमंत्र्यांनी आपली जबाबदारी स्वीकारून शेतकऱ्यांना भरीव आर्थिक मदत देण्याची गरज होती. मात्र असे न करता पालकमंत्री केवळ शेतावर आले आणि निघून गेले असा आरोप राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश सचिव पंकज पळसकर यांनी केला आहे.

## विविध वृत्त...

### मेहकर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे नवे अभ्यासक्रम सुरु; युवकांसाठी करिअरची संधी

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मेहकर येथे २०२५ सत्रापासून न्यू एज कोर्सेस अंतर्गत सोलार टेक्निशियन (इलेक्ट्रीकल) (१ वर्ष) आणि मेकॅनिक इलेक्ट्रिक व्हेहीकल (२ वर्ष) हे नवीन व्यवसाय अभ्यासक्रम सुरू करण्यात आले असून, त्यांना शासनाची मान्यता प्राप्त झाली आहे.

या दोन्ही कोर्सेससाठी दहावी उत्तीर्ण तसेच आयटीआय शिक्षण घेण्यास इच्छुक असलेल्या उमेदवारांना प्रवेश घेण्याची संधी उपलब्ध आहे. सदर कोर्सेसमुळे विद्यार्थ्यांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या विविध संधी उपलब्ध होतील. सौरऊर्जा व इलेक्ट्रिक वाहन या दोन्ही क्षेत्रांत भविष्यातील मागणी लक्षात घेता, ही संधी विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरणार आहे. यापूर्वी अर्ज केलेले तसेच नव्याने अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्राधान्यक्रम निवडण्याचा पर्याय उपलब्ध राहणार आहे. संस्थेचे प्राचार्य यांच्या वतीने सर्व इच्छुक विद्यार्थी आणि पालकांना आवाहन करण्यात आले आहे की, या कोर्सेसमध्ये सहभागी होऊन आपल्या करिअरला नवी दिशा द्यावी. अधिक माहितीसाठी इच्छुक उमेदवारांनी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मेहकर येथे संपर्क साधावा.

### लोकशाही दिन ४ ऑगस्टला

**बुलढाणा/प्रतिनिधी :** दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिन आयोजित करण्यात येतो. त्यानुसार ऑगस्ट महिन्याचा लोकशाही दिन सोमवार, दि. ४ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी १ वाजता जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात घेण्यात येणार आहे. लोकशाही दिनासाठी तक्रारदारांनी उपस्थित राहावे, उपस्थित राहणे शक्य नसल्यास तक्रारी रजिस्टर पोस्टाने लोकशाही दिनाआधी जिल्हाधिकारी कार्यालयात पोहोचतील अशाप्रकारे पाठवावेत, असे प्र. निवासी उपजिल्हाधिकारी सुहासिनी गोणेवार यांनी कळविले आहे.

### राजर्षी शाहू महाराज जेष्ठ साहित्यीक व कलावंत मानधन सन्मान योजना; १० ऑगस्टपर्यंत मुदतवाढ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागामार्फत कला व साहित्य क्षेत्रातील योगदान असलेल्या ज्येष्ठ साहित्यिक व कलाकारांसाठी 'राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलाकार मानधन सन्मान योजना' राबविण्यात येते. पात्र जेष्ठ साहित्यीक व कलावंतांसाठी अर्ज भरण्याची अंतिम मुदत १० ऑगस्ट २०२५ पर्यंत वाढविण्यात आली आहे. या योजनेच्या लाभासाठी ज्येष्ठ साहित्यिक व कलाकारांनी अर्ज करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. पात्र लाभार्थ्यांनी https://mahakalasanman.org/pgeApplicationFromForUser.aspx लिंकवर जाऊन ऑनलाईन अर्ज भरावा. तसेच आपले सरकार पोर्टलवरूनही अर्ज सादर करता येईल. ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर अर्जाची दोन प्रिंटआउट प्रती संबंधित गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालयात कार्यालयीन वेळेत व मुदतीत सादर करणे आवश्यक आहे. अर्जासोबत वयाचा दाखला, आधार कार्ड, उत्पन्नाचा दाखला, रहिवासी दाखला, प्रतिज्ञापत्र, बँक पासबूक, लागू असल्यास पती व पत्नीचा एकत्रित फोटो, दिव्यांगत्व असल्यास दिव्यांगत्वाचा दाखला, राज्य, असल्यास केंद्र सरकार पुरस्कार प्रमाणपत्र, नामांकित संस्था, व्यक्ती यांचे शिफारस पत्र असल्यास तसेच अन्य पुरावे जोडावेत.

## शिवसेना नेते तथा केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या अध्यक्षतेखाली चिखली येथे ३ ऑगष्टला शिवसेना पदाधिकाऱ्यांची बैठक



**बुलढाणा/प्रतिनिधी :** शिवसेनेच्या संघटनात्मक दृष्टिकोनातून चिखली विधानसभा मतदारसंघातील शिवसेना युवा सेना महिला आघाडी पदाधिकाऱ्यांची बैठक शिवसेना नेते तथा केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या उपस्थितीत ३ ऑगस्ट रोजी चिखली येथे आयोजित करण्यात आली आहे

आगामी जिल्हा परिषद पंचायत समिती नगर परिषदेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेचा संघटनात्मक आढावा घेण्याच्या दृष्टिकोनातून शिवसेना नेते तथा केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या अध्यक्षतेखाली चिखली येथील मकरध्वज खंडाळा रोड स्थित असलेल्या राधाबाई खेडेकर विद्यालयात दुपारी १२ वाजता ही बैठक होणार आहे याबैठकीला शिवसेनेचे जिल्हा संघटक तथा आमदार संजय गायकवाड माजी आमदार संजय रायमुलकर शशिकांत खेडेकर , जिल्हाप्रमुख ओमसिंग राजपूत प्रा बळीराम मापारी ,युवासेना जिल्हाप्रमुख ऋषी जाधव शिवसेना महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख मायाताई म्हस्के उपस्थित राहणार आहेत चिखली येथे होणाऱ्या या बैठकीला शिवसेना युवासेना महिला आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहावे अस आवाहन शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख शिवाजीराव देशमुख निलेश गुजर तालुकाप्रमुख गजानन मोरे धनंजय बारोटे यांनी केले आहे

## नरसिंह मंदिरात रात्रंदिवस विष्णुसहस्त्रनामाचे अखंड पठण



**मेहकर/प्रतिनिधी :** मेहकरच्या नरसिंह मंदिरात श्रावणमासाच्या निमित्ताने २६ जुलै ते २ ऑगस्ट याकाळात विष्णुसहस्त्रनाम स्तोत्राचे रात्रंदिवस अखंडपणे हजारो पाठ करण्यात आले. श्री नरसिंह संस्थानच्या वतीने राबविलेल्या या धार्मिक उपक्रमाला भाविकांचा उदंड प्रतिसाद मिळाला आहे.

पौराणिक दृष्ट्या जगातील अकरापैकी सहावे असलेल्या नरसिंह मंदिरात या स्तोत्राचे विशेष महत्त्व आहे. त्यामुळे संस्थानचे अध्यक्ष सद्गुरु ॲड.रंगनाथ महाराज पितळे यांच्या प्रेरणेने दरवर्षीप्रमाणे श्रावणातल्या पहिल्या शनिवारपासून दुसऱ्या शनिवारपर्यंत हे अखंड पाठ करण्यात आले. दिवसभर महिला भाविक आणि रात्रभर पुरुष भाविकांनी एक मिनिटाचाही खंड पडू न देता या स्तोत्राचे सलग पाठ केले. हा आध्यात्मिक क्षेत्रातला एक विक्रम असून तो इतरत्र कुठेही होताना दिसत नाही.

दरम्यान, २ ऑगस्ट रोजी संतश्री बाळाभाऊ महाराजांच्या प्रतिमा पूजनानंतर सामूहिक पाठ व महाआरती झाली. तसेच सद्गुरु पितळे महाराज यांचे आशीर्वचन लाभले. संस्थानच्या वतीने यावेळी मे.ए.सो.संस्थेचे अध्यक्ष हर्षल सोमण, वकील संघाचे अध्यक्ष ॲड.अनिल अडेलकर, न.पा.चे विधी सल्लागार ॲड.विनोद नरवाडे, डॉ.नेहा गायकवाड यांचा सत्कार करण्यात आला. शेवटी संस्थानच्या ज्ञानमंदिर मठात महाप्रसादाचे वितरण करण्यात आले.

## शासन आणि जनते मधील दुवा म्हणजे महसूल प्रशासन : तहसीदार तेजनकर

### महसूल दिनी उत्कृष्ट कार्य करणाऱ्यांचा सत्कार



दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी :** शासन आणि जनतेमधील दुवा म्हणजे महसूल प्रशासन असून, विविध योजनांच्या माध्यमातून शेतकरी आणि नागरिकांपर्यंत सेवा पोहोचवणे हे आपले मुख्य कर्तव्य आहे असे अध्यक्षीय भाषणात तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर म्हणाल्या रिसोड तहसील कार्यालयात १ ऑगस्ट रोजी महसूल दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर होत्या. प्रमुख अतिथी म्हणून गटविकास अधिकारी किशोर लहाने, प्रभारी दुय्यम निबंधक बालाजी मदने,नायब तहसीलदार गजानन जवादे, निवासी नायब तहसीलदार सुभाष जाधव, अन्नपुरवठा निरीक्षक गणेश तांगडे रिसोड तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष सतीश मांदळे मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुधाकर पडधान यांनी केले. त्यांनी महसूल प्रशासनाचे कार्य, जबाबदाऱ्या व त्याचे महत्त्व याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

आपल्या अध्यक्ष भाषणात तहसीलदार तेजनकर पुढे म्हणल्या की, शासनाचे विविध उपक्रम रिसोड तालुक्यात सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने आपण जिल्ह्यात अव्वल काम करू शकलो यामध्ये १४०% महसूल वसूल करणे, ॲग्री स्टॅग चे काम ११५ टक्के करणे, शासनाचा महत्त्वकांक्षी जलतारा उपक्रम तालुक्यात यशस्वी राबविणे, पांदण रस्ते खुले करणे, पिक पेरा, विविध दाखल्याचे वाटप करणे, पुरवठा विभागाचे अद्यावत काम तसेच शासनाने मागितलेली माहिती वेळेच्या आत पोहोचणे यासारखे विविध कामे सर्वांच्या मदतीने शक्य झालेले आपण जिल्ह्यात चांगली कामगिरी करू शकलो महसूल विभागात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी, कर्मचारी आणि महसूल सेवकांचा प्रमुख मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन तलाठी धनंजय काष्टे यांनी तर आभार प्रदर्शन गजानन गरकळ यांनी केले.

या कार्यक्रमाला तहसील कार्यालयातील सर्व अधिकारी, कर्मचारी, मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी, महसूल सेवक तसेच शहरातील नागरिक, पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दारव्हा आठवडी बाजारात मच्छी विक्री करण्यास मज्जाव

### मच्छीमार भोईंना धमक्या; पोलीस ठाण्यात तक्रार दाखल

दैनिक आपला विदर्भ

दारव्हा/प्रतिनिधी : येथील आठवडी बाजारात पारंपरिक मच्छी विक्री व्यवसाय करणाऱ्या भोई समाजातील मच्छीमारांना दारव्हा येथील काही मच्छी विक्री करणाऱ्या लोकांकडून धमक्या दिल्या जात असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी सुभाष रामजी मालटे, शंकर मिठूजी बावणे यांच्यासह इतर मच्छी विक्री करणाऱ्या समाजबांधवांनी दारव्हा पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दाखल केली आहे.

दिनांक ३० जुलै रोजी मच्छी विक्रीसाठी बाजारात आलेल्या तक्रारदारांना मोहसीन खान, शाहरुख खान आणि फिरोज खान या व्यक्तींनी अडवून ''इथे मच्छी विक्री करायची नाही,केली तर जिवंत ठेवणार नाही'' अशा शब्दांत धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद आहे. त्यामुळे पारंपरिक मच्छीमारी व विक्रीचा व्यवसाय असणाऱ्यावर उपासमारीची वेळ आली असून भीतीपोटी मागील ४-५ दिवसांपासून मच्छी विक्री बंद केली आहे.




तक्रारदारांनी पोलीस प्रशासनाकडे सुरक्षिततेची मागणी करत दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. आम्ही कोणाच्याही व्यवसायात अडथळा आणत नाही. आमचा पारंपरिक व्यवसाय असून आमच्याकडे उत्पन्नाचे दुसरे कोणतेही साधन नाही, असेही त्यांनी निवेदनात स्पष्ट केले आहे.

या तक्रारीची प्रत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, यवतमाळ पोलीस अधीक्षक आणि दारव्हा नगर परिषद मुख्याधिकारी यांच्याकडेही पाठवण्यात आली आहे. तक्रारीवर लवकरात लवकर चौकशी करून न्याय द्यावा, अशी अपेक्षा मच्छी विक्रेता भोई समाजातून व्यक्त होत आहे.